आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)

शुक्रवार दिनांक १८ जुलै २०२५

<u>ठळक बातम्या</u>

1. सर्जनशील अर्थव्यवस्थेत कामासाठी धडपडणाऱ्यांना साधनसामुग्री आणि प्रशिक्षण देण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याची केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांची ग्वाही

2. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते गडचिरोली जिल्ह्यात चाळीस लाख वृक्ष लागवड मोहिमेचा शुभारंभ, २२ जुलैपासून 'वृक्ष लागवड पंधरवडा'; एक कोटी वृक्ष लागवडीच्या उद्दिष्टाचा पहिला टप्पा

3. नागपूरच्या जिल्हा क्रीडा संकुल आणि नरखेड तालुका क्रीडा संकुलाच्या विकासासाठी विशेष निधी उपलब्ध करून दिला जाईल- महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची माहिती

4. नागपूर रेलवे स्थानकाच्या पश्चिम भागातील पोर्च परिसरात भव्य शताब्दी प्रदर्शनी आयोजित, शतकी गौरव – वारसा, प्रगती आणि जोडणीचा प्रवास उलगडणार

<u>आयआयसीटी</u>

देशातली पहिली भारतीय सर्जनशीलता तंत्रज्ञान संस्था - आयआयसीटी आणि राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळ - एन एफ डी सी च्या संयुक्त कॅम्पसचं उद्घाटन आज मुंबईत केंद्रीय माहिती आणि प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झालं. या संस्थेत १७ अभ्यासक्रमांचा समावेश असून, गेमिंग, ॲनिमेशन, पोस्ट-प्रॉडक्शन, कॉमिक्स अशा क्रिएटिव्ह इंडस्ट्रीशी संबंधित विषय शिकवले जाणार आहेत. आयआयसीटीने इंग्लंडच्या यॉर्क विद्यापीठाशी करार केला असून, अभ्यासक्रमांची देवाणघेवाणही होणार आहे.मुंबईत सुरु झालेलं IICT हे केंद्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा सर्जनशील भारताचा संकल्प साकारतंय, असं मत माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी यावेळी व्यक्त केलं. या संस्थेत उद्योगाशी थेट संबंधित १७ अभ्यासक्रम शिकवले जाणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

*आयआयसीटी इंडियन इंस्टीट्यूट ऑफ क्रिएटिव टेक्नोलॉजी टेक्नोलॉजी आज के क्रिएटिव वर्ल्ड में जीस तरह से एक इंटीग्रल पार्ट बन चुकी है उसमें बहुत जरूरी है कि हमारी क्रिएटिव।इकॉनमी में काम करने वाले जीतने भी लोग हैं और जो इससे जुड़ना चाहते हैं उन सबको हम नए स्किल्स लें। टेक्नोलॉजीज में ट्रेनिंग दें, नए टूल्स दें और दुनिया में जो बेस्ट हो रहा है उसको हम अपने यहाँ पर भारत में लेकर आए और यहाँ से नए इन्क्यूबेशन, नए आइडियास, नई टेक्नोलॉजीज भी भारत से बनी।*

आयआयसीटी ही संस्था मुंबईत उभी राहणं हे सर्जनशील अर्थव्यवस्थेला दिशा देणाऱ्या भारताच्या वाटचालीतलं मोठं पाऊल, असल्याचं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. येत्या दोन वर्षात ही संस्था नावारुपाला येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.तात्पुरता कॅम्पस आणि प्रवेश सुरु झाल्याचे फडणवीस म्हणाले

*या आयआयसीटीकरता महाराष्ट्र सरकारने फिल्मसिटीमध्ये गोरेगावमध्ये एक जागा दिलेली आहे. त्याकरता भारत सरकारने 400 कोटी रुपये बिल्डिंग बांधण्याकरता दिले आहेत. अतिशय आयकॉनिक अशा प्रकारची बिल्डिंग त्या ठिकाणी तयार होते आहे, पण 2 वर्ष वाट न पाहता लगेचआयआयसीटी सुरू करण्याकरता याठिकाणी एक कॅम्पस सुरू करण्यात आलेला आहे आणि आजपासनं त्याच्या ॲडमिशन देखील ओपन झालेले आहेत.*

<u>हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र</u>

हरित महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र" या अभियानांतर्गत गडचिरोली जिल्ह्यासाठी राज्य शासनाने एक कोटी वृक्ष लागवडीचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट दिले असून, या उपक्रमाचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते येत्या २२ जुलै रोजी गडचिरोली येथील कृषी महाविद्यालयाच्या प्रांगणात होणार आहे. यानिमित्ताने जिल्ह्यात 'वृक्ष लागवड पंधरवडा' सुरू करण्यात येत असून, पहिल्या टप्प्यात ४० लाख वृक्ष लागवडीचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे.या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांच्या अध्यक्षतेखाली आज यंत्रणांची आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी त्यांनी वृक्ष लागवडीनंतर झाडे जिवंत राहण्यासाठी प्रत्येक झाडाची एक वर्षांची जबाबदारी निश्चित करण्याचे सांगितले. केवळ वृक्षारोपण नव्हे तर त्याचे संरक्षण व संवर्धन हाच खरा पर्यावरण पूरक दृष्टिकोन असून, यासाठी शासकीय यंत्रणा आणि नागरिकांचा सहभाग महत्त्वाचा आहे, असेही त्यांनी नमूद केले.

<u>कृषीमंत्री माणिकराव कोकाटे</u>

बोगस बियाणे विक्री करणाऱ्याविरोधात कठोर कायदा आणून तो राज्यात लागू करण्याचा विचार केंद्र सरकार करत असल्याचं कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी आज विधानसभेत सांगितलं. कॉंग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी याबाबत प्रश्न विचारला होता. बोगस बियाणे विक्रेत्यांविरोधात होणाऱ्या किरकोळ कारवाईमुळे हे प्रकार सातत्याने होत असल्याचा आरोप वडेट्टीवार यांनी केला.

राहुल नार्वेकर

विधीमंडळ सभागृहातल्या सदस्यांनी सभागृहाच्या प्रतिष्ठेला बाधा पोहोचेल असं वक्तव्य माध्यमांसमोर करू नये, अशी ताकीद, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिली. प्रत्येक सदस्य हा आपापल्या मतदारसंघातल्या लाखो लोकांचं प्रतिनिधित्व करत असतो, त्यामुळे केवळ सभागृहच नाही तर जनतेची प्रतिष्ठा राखणं सदस्याचं कर्तव्य आहे, असं अध्यक्ष म्हणाले. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार भास्कर जाधव आणि आदित्य ठाकरे यांनी काल अध्यक्ष आणि सत्ताधारी बाकांकडे पाहून अपमानास्पद हातवारे केले, तसंच शब्द वापरले. त्यामुळे त्यांच्यावर कारवाई करावी अशी मागणी मंत्री शंभुराज देसाई आणि दादा भुसे यांनी केली.दरम्यान, विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाचा आज समारोप होणार आहे.

दहीहंडी

राज्यातल्या दहीहंडी खेळातल्या दीड लाख गोविंदांचा विमा उतरवला जाईल, अशी घोषणा क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज विधानसभेत केली. अमित साटम यांनी हा मुद्दा उपस्थित केला होता.

तालुका क्रीडा संकुल

नागपूरच्या जिल्हा क्रीडा संकुल आणि नरखेड तालुका क्रीडा संकुलाच्या विकासासाठी मंत्रिमंडळाच्या परवानगीने विशेष निधी उपलब्ध करून दिला जाईल. त्याबरोबरच क्रीडा विभागाला कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी फंडातून निधी मिळवण्यासाठी अध्यादेश काढण्याचे निर्देश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बैठकीत दिले. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या दालनात नागपूरच्या क्रीडा धोरणाला गती देणारी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे, क्रीडा विभागाचे अप्पर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर आणि क्रीडा विभागाचे अधिकारी उपस्थित होते. नागपूर जिल्हा क्रीडा संकुलाची निर्मिती मौजा गादा, कामठी येथील १९ एकर जागेवर होत आहे. जिल्हा क्रीडा संकुलात बॅडमिंटन हॉल, ४०० मी. धावपट्टी, फुटबॉल व हॉकी मैदान, वाहनतळ, कार्यालय, स्टोअर रूम, प्रसाधनगृह, जिम्नॅशियम हॉल, पार्किंग व्यवस्था, संरक्षक भिंत यांसारख्या सुविधा पूर्ण झाल्या असून, त्या सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे पुढील एका महिन्यात हस्तांतरित केल्या जाणार आहेत.

मध्य रेल्वे

भारतीय रेल्वेतील एक प्रतिष्ठित आणि ऐतिहासिक स्थानक म्हणून ओळखले जाणारे नागपूर जंक्शन स्थानकाने राष्ट्रसेवेचे 100 गौरवशाली वर्ष पूर्ण केले आहेत. या ऐतिहासिक प्रसंगी, स्थानकाच्या पश्चिम भागातील पोर्च परिसरात भव्य शताब्दी प्रदर्शनी आयोजित करण्यात आली आहे, ज्यात स्थानकाच्या वास्तुशैली, ऐतिहासिक महत्त्व आणि सांस्कृतिक प्रवासाचे दर्शन घडवले आहे.प्रदर्शनात दुर्मिळ छायाचित्रे, ऐतिहासिक कागदपत्रे, जुन्या तिकीट प्रणाली, रेल्वे युनिफॉर्म, आणि स्थानकाच्या भूतपूर्व व भावी रचनेचे 3D मॉडेल्स दाखविण्यात आले आहेत. एलईडी डिस्प्ले आणि ऐतिहासिक वस्तू नागपूर स्थानकाचा 100 वर्षांचा प्रवास उलगडून दाखवतात.सध्या ₹488 कोटी खर्चाच्या अमृत भारत स्टेशन योजना अंतर्गत स्थानकाचे पुनर्विकास कार्य सुरू असून, यामध्ये आधुनिक रूफ प्लाझा, मल्टीमोडल इंटिग्रेशन, 28 लिफ्ट्स, 31 एस्केलेटर, बेसमेंट पार्किंग आणि दिव्यांग अनुकूल सुविधा यांचा समावेश आहे.

मनसुख मांडविया

केंद्रीय आरोग्य सेवा योजनेच्या (CGHS) दरांमध्ये सुधारणा करण्याची बाब केंद्र सरकारच्या विचाराधीन असून लवकरच त्यात सुधारणा केली जाईल, अशी ग्वाही केंद्रीय श्रम व रोजगार मंत्री मनसुख मांडविया यांनी दिली. राज्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी बुधवारी नवी दिल्ली येथे केंद्रीय श्रम व रोजगार मंत्री श्री. मांडविया यांची वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळासह भेट घेतली. या भेटीत महाराष्ट्रातील राज्य कामगार विमा योजना रुग्णालयांच्या सद्यस्थितीबाबत सविस्तर चर्चा झाली.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून येथील मुख्यमंत्री सचिवालयात (हैद्राबाद हाऊस) सुरु झालेल्या मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षातून जानेवारी ते जून २०२५ दरम्यान विदर्भातील गरजु व पात्र रुग्णांना गंभीर व दुर्धर आजारावरील वैद्यकीय उपचारासाठी एकूण १ हजार ११३ गरजुंना ९ कोटी ६२ लाख ४२ हजार ५०० रुपयांचे अर्थ सहाय्य देण्यात आले आहे. उमरेड येथे एमएमपी इंडस्ट्रीज लि. मधील दुर्घटनेत मृत झालेल्या ७ कामगारांच्या परिवारालाही या कक्षाद्वारे
प्रत्येकी ५ लाख रुपयांची मदत करण्यात आली.

राज्य उत्सव

गणेशोत्सवाला राज्य उत्सव म्हणून मान्यता दिली जाईल, अशी घोषणा सांस्कृतिक कार्यमंत्री आशीष शेलार यांनी आज विधानसभेत केली. आपल्या रीतीरिवाजाचं जतन व्हावं यासाठी या उत्सवाला राज्य उत्सव म्हणून मान्यता दिली जात असल्याचं त्यांनी सांगितलं. यानिमित्त राज्यभरात आणि राज्याच्या बाहेर विविध सांस्कृतिक कार्यक्रम, व्याख्यानमाला, स्पर्धा, ड्रोन शो आयोजित केले जातील, उत्कृष्ट गणेश मंडळ स्पर्धा तालुकास्तरावर आयोजित केल्या जातील, गणेशोत्सवानिमित्त टपाल तिकीट आणि नाणे काढले जातील, तसंच उत्सवासाठी भरीव निधीची तरतूद केली जाईल, असं शेलार यांनी सांगितलं.

*****